म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. ५७८४

IRBK-0105764

IRBK-0105764

म. ग्रं. सं. ठाणें
बा.वा
१२५८



IRBK-0105764

बालवर्गाकरितां सचित्र


# मौजेचें

# पुरवणी-वाचन

लेखक

गंगाधर गोपाळ पारखी

किंमत सहा आणे



चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

२९०४५ बा. वा. १२९८ ३१-३-६९

: मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक : चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणे शहर

* * *


सुधारलेली नवी आवृत्ति : १ : जुलै १९५४
,, ,, : २ : मार्च १९५६

• • •

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

* * *

# १. नमन



ए भरत, ऐक.


वर सर.

सरळ बस.

मग नमन कर.

* * * *

# २. मखर



बबन, सरळ बस.
लवकर खळ कर.
मग एक मखर कर.
मखर भरभर कर.
मखर सरळ बसव.

✣ ✣ ✣ ✣

# ३. फणस



कमल, लवकर चल. भरकन परकर पसर.

एक एक फणस भर. एक फणस खपव.

एक फणस परत कर. गणपत, फणस लपव.

# ४. ऊंस



गणपत, नऊ ऊंस उचल. चरक सरळ बसव.
मग जवळ बस. ऊंस भरभर सरकव.
भरत, चरक वळव. गऊ, रस भर.

❖ ❖ ❖ ❖

# ५. अंगण

क्र. ५७६४



गणपत, आज अवस. आज अंगण आवर.
ओमण सरळ रच. औत वर बसव. सरपण आंत रच.
गवत वर आण. मग अंगण खण.

# ९. कावळा



दादा, कावळा आला.

हा बघ कावळा दगडावर बसला.

कावळा काव काव असा ओरडला.

वाहवा ! कावळा डाळ

खाऊं लागला !

दादा, कावळा हाण.

अग माई, कावळा भरकन उडाला.

हा बघ आतां झाडावर बसला.

माई, बाळाला कावळा दाखव.

बाळ, कावळा पाहा.



* * * *

# ६. दळण



आऊ, पटकन् ऊठ. परकर वर आवर. जलद् वर चढ.
तबकभर दळण आण. चटकन् दळण कर.
तरट पसर व वर बस. बबन, जवळ बसव.
मग दळण दळ.

* * * *



# ७. हरण

नरहर, झपझप चल.

झटकन पपईआड लप.

मग हरण पकड.

सई, हरण वळव.

नरहर, एकदम हरण पकड.

हरण बळकट पकड.

सई, झडप वर कर.


नरहर, हरण आत आण.

आई, तरट पसर.

नरहर, हरण वर बसव.

सई, गवत आण.

# ८. रथ



दशरथ, झडप उघड, व रथ आंत आण.
मग रथ सजव. दलपत, रथ सरळ धर.
गणपत, छत वर ओढ. दशरथ, कळस सरळ बसव.
मखर वर सरकव. बबन, चल व रथ बघ.
दलपत, रथ सरळ ओढ.

* * * *

# ९. कावळा



दादा, कावळा आला.
हा बघ कावळा दगडावर बसला.
कावळा काव काव असा ओरडला.
वाहवा ! कावळा डाळ
खाऊं लागला !

दादा, कावळा हाण·



अग माई, कावळा भरकन उडाला.

हा बघ आतां झाडावर बसला.

माई, बाळाला कावळा दाखव.

बाळ, कावळा पाहा.



# १०. दिवस उगवला

दिवस उगवला,

भिका उठला,

पिवळा डगला घातला,

आणि रानांत निघाला.

शिवराम उठला,

चिटाचा सदरा घातला.

वर हिरवा डगला चढविला,

आणि गांवाला निघाला.

दिनकर उठला,


बिछाना आवरला,

आणि धडा शिकत बसला.

* * * *

२८०७५





# ११. चिमणी

काशी, ही बघ चिमणी.
ती चिंव चिंव करीत बसली आहे.

काशी, चिमणीला पसाभर बाजरी टाक.

बघ, चिमणी खालीं उतरली.
ती कशी पटपट बाजरी खाऊं लागली.

काशी, ही बघ आणखी एक चिमणी आली.
ती बादलीवर बसली,
व पाणी पिऊं लागली.


मामी, चिमणीला धरावयास जाऊं का ?

अरे, ती हातीं लागणार नाहीं.

बघ, चिमणी उडाली.


❖ ❖ ❖ ❖

# १२. सगुणाची बाहुली



सगुणाला नवी बाहुली मिळाली.
सगुणा ती मुलींना दाखवावयास निघाली.
सगुणा पळत पळत चालली.
पण पळतां पळतां ती पडली व तिची बाहुली फुटली.
सगुणा मुळुमुळु रडत बसली.
तें पाहून काशी हंसली. पुतळी हंसली.
पण कुसुम हंसली नाहीं. ती चटकन घरीं गेली.
तिनें आपली बाहुली आणून सगुणाला दिली.
सगुणा खुदकन हंसली.


# १३. अंबू गाय




काकू, आपली अंबू गाय उठली.
बाबू, अंबूला पाटीभर भूस घाल;
मग वासरूं पाजून दूध काढ.
सदू, ऊठ. बाबू दूध काढूं लागला.
तूं गडूभर दूध पी. विनूलाहि गडूभर दूध पाज.
विनू, बघ आपली अंबू. आतां रानांत चालली.
ती रानांत जाऊन खूप चारा खाईल.

* * * *

# १४. केशवची फजिती



आईनें पेढे केले.

एक पेढा केशवला दिला. बाकीचे पेढे पातेलींत घातले व पातेली फळीवर ठेवून आई बाहेर गेली.

केशवला वाटलें आपण आणखी पेढे खावेत.

केशव हळूंच घरांत आला. केशवनें घमेलें पालथें घातलें, व वर चढून फळीला धरिलें. केशव पेढे काढूं लागला.

पण फळी घसरली व अंगावर पडली. पातेलीहि अंगावर पडली. सगळे पेढे घरभर पसरले. केशव खालीं पडला. केशवला खूप लागलें. केशव रडत बसला. आई आली व केशवला खूप रागें भरली.



# १५. आमचे बै

हे पहा आमचे बैल.
कसे छान आहेत! एका
नांव हैबती व एकाचे
नांव खैरू.

आमचे हे बैल आतां
शेताला चालले. आमचा
दादा बैलांना शेताला नेत
आहे. आई, मी शेताला
जाऊं का? मैना, बैलांना
सहा पैशांची वैरण आणून
ठेव आणि मग दादाची
भाकरी घेऊन शेताला जा.

हें पहा आमचें शेत.
दादा औत हाकीत आहे.

दादा, बैल दमले आहेत.
आतां औत पुरें कर, बैलांना
वैरण घाल व तूं भाकरी खा.

* * *

# १६. दोन पोपट



मोरूनें दोन पोपट पाळिले होते. एक मोठा होता व दुसरा थोडा लहान होता. ते एक-मेकांशीं बोलत असत व मजेनें राहात असत.

एके दिवशीं मोठा पोपट मेला. आपला सोबती मेलेला पाहून दुसरा पोपट एकसारखा रडत बसला. तो कांहीं खाईना व पाणीहि पिईना. मोरूला मोठी काळजी पडली.

मग मोरूनें एक मोठा आरसा आणिला, आणि तो लहान पोपटासमोर लाविला. आरशांत दुसरा पोपट दिसूं लागला. लहान पोपटाला वाटलें, आपला सोबती आला. मग तो खाऊं-पिऊं लागला व सुखानें राहूं लागला.



# १७. लबाड हौशा


हौशा नांवाचा एक लबाड मुलगा होता. एके दिवशीं हौशा गादीवर निजला होता. हौशाला झोप येईना. हौशा बोलला, ‘ आतां लोकांची मौज करतों.’

मग हौशा बाहेर आला, चौकांत उभा राहिला व ‘ चोर चोर ’ असें ओरडला. हौशाची आरोळी ऐकून लोक धांवून आले. फौजदारहि आले. पण चोर दिसेना. हौशा डोळानें हंसला व बोलला, “ कशी मौज केली. ” हौशानें लोकांना असें दोन तीन वेळां फसविलें.

एके दिवशीं खरोखरच चोर आला. हौशा ‘ चोर चोर ’ असें ओरडला. पण कोणीहि धांवून आला नाहीं. चोरानें हौशाला मारिलें व घरांतील दागिने नेले.

* * * *

# १८. पतंग




पांडूदादा, तूं मला रंगीत कागदाचा पतंग करून देणार होतास ना ? होय चिंतू, मी कालच पतंग करून ठेविला आहे. हा घे पतंग. ओहो ! दादा, हा पतंग फार चांगला झाला आहे. आतां मी वसंताला व धोंडूला घेऊन पतंग उडवावयास जातों.

वसंत, हा बघ माझा पतंग. चल. आपण पटांगणांत पतंग उडवावयास जाऊं. वसंत, तूं पतंग धर व मी दोरा धरितों. आतां तूं पतंग उंच उडव. बघ. पतंग उंच उंच चालला. अरे वा ! आतां हा किती तरी उंच गेला ! गंगू, पतंगाची गंमत बघ.

* * * *

# १९. गाढव आणि मांजर



एका कुंभारानें एक गाढव आणि एक मांजर पाळलें होतें. तो गाढवास पडवींत बांधीत असे व खावयास दाणावैरण पोटभर घालीत असे! गाढवहि कुंभाराचें काम मनापासून करीत असे. मांजराला कांहीं काम नसे. तें मालकाबरोबर दूधभात खाई व इकडे तिकडे हिंडे.

मालक घरीं आला कीं तें 'मियाव, मियाव' करीत जवळ जाऊन मांडीवर बसत असे.

एके दिवशीं गाढवाला वाटलें कीं, "मांजर लाडानें मालकाजवळ जातें व मांडीवर बसतें, यामुळेंच मालक

मांजराला कांहीं काम सांगत नाहीं. आपणहि असेंच केलें तर आपणालाहि काम करावें लागणार नाहीं." मग गाढव आपलें दावें तोडून ओरडत ओरडत ओसरीवर गेलें व मालकाजवळ जाऊन मांडीवर बसूं लागलें. मालकास गाढवाचा फार राग आला. मग मालकानें एक भली मोठी काठी घेऊन गाढवास खूप बडविलें.

* * * *

# २०. घोडा आणि गाढव

पांडू या नांवाचा एक तांबट होता. पांडूनें एक गाढव आणि एक घोडें पाळिलें होतें. तो भांडीं विकावयास जातांना सगळें ओझें गाढवावर घालीत असे; व घोडा ऐटींत मोकळाच चालवीत असे.

एके दिवशीं पांडू भांडीं विकावयास निघाला असतां गाढव आजारी होतें. तें घोडोबाला बोललें, "घोडेदादा, मी आजारी आहें. मला एवढें ओझें घेऊन चालवत नाहीं. तूं थोडें ओझें घेतोस का?" घोडा बोलला, "अरे वा! मी ओझें वाहणारा आहे काय? तें काम माझें नाहीं. पुढें पाहून झपझप चल."



बिचारें गाढव खरडत खरडत कसें तरी चाललें. पण चालतां चालतां ठेंच लागून पडलें. सगळीं भांडीं खालीं पडलीं व गाढवाचा पाय मोडला. मालक धांवत आला. गाढवाला उठवूं लागला. पण पाय मोडला होता, मग तें कसें उभें राहणार ?

मग पांडूनें सगळीं भांडीं घोडोबावर घातलीं व गाढवालाहि घोडोबाच्या पाठीवर बांधून टाकिलें. मग घोडोबाला एक चाबकाचा फटकारा मारून घराकडे चालावयास सांगितलें. चालतांना घोडा मनांत बोलला, "अगोदरच जर थोडें ओझें घेतलें असतें तर बरें झालें असतें. आतां सगळें ओझें घेऊन, शिवाय गाढवालाहि पाठीवर घेऊन जावें लागत आहे."

* * * *



# २१. घाणेरडा बंडू

बंडू या नांवाचा एक मुलगा होता. तो सकाळीं निजून उठला कीं, अगोदर आईजवळ खाऊ मागत असे. आई बंडूला रोज सांगत असे कीं, "बंडू, दांत घास, तोंड धू आणि मग खाऊ खा." पण बंडू आईचें ऐकत नसे. आईनें खाऊ दिला नाहीं तर बंडू रडत बसे. बंडूला आंघोळीचा फार कंटाळा होता. चार चार दिवस तो मुळींच आंघोळ करीत नसे.

कांहीं दिवसांनीं बंडूच्या अंगावर खरूज आली व दांतांना कीड लागून ते दुखूं लागले. बंडू रडूं लागला. आईला फार वाईट वाटलें. आईनें बरींच औषधें लाविलीं, पण बंडूची खरूज बरी होईना व दांतहि बरे होईनात.

एके दिवशीं बंडूची थोरली बहीण आली. ती

चांगली शिकलेली होती. बंडूला खरूज कां आली व दांतांना कीड कां लागली हें तिला समजलें. मग ती दररोज सकाळीं बंडूचे दांत चांगले घासूं लागली व तोंड धुवूं लागली. ती बंडूला दररोज आंघोळहि घालूं लागली. कांहीं दिवसांनीं बंडूची खरूज आपोआप बरी झाली व दांतहि साफ बरे झाले.

## २२. दोन उंदीर



दोन उंदीर होते. ते इकडून तिकडे तिकडून इकडे हिंडत होते. तेथें एक दुधाचें पातेलें होतें. ते उंदीर दूध खावयास गेले व दुधांत पडले. उंदरांना बाहेर निघतां येईना. दोघांपैकीं एक उंदीर फार घाबरट होता. तो अगदीं घाबरून गेला व हातपाय न हालवितां नुसती काळजी करीत बसला.

२५०७५
ग्रं. नं.
१२१७
३।९।३।८



कांहीं वेळानें नाकातोंडांत दूध शिरून तो मेला व वळचणीं गेला.

दुसरा उंदीर धीट होता. तो न घाबरतां एकसारखा हातपाय हालवीत पोहत राहिला. हातपाय हालवितां हालवितां दूध घुसळलें जाऊन दुधावर लोणी आलें. लोणी दुधावर तरंगलें. मग उंदराला बसून राहावयास चांगली जागा झाली. तो विसांवा घेत व लोणी खात खुशाल बसला.


कांहीं वेळानें दुधाचा मालक आला. मालकानें वर बसलेला उंदीर उचलून बाहेर टाकिला. तो टुणटुण उडत बिळांत गेला. पहा, धीट उंदीर जगला; पण घाबरट उंदीर फुकट मेला.

* * * *

## २३. कशी खोड मोडली

रामू व सदू या नांवाचे दोघे भाऊ होते. रामू फार उनाड होता. तो आईचें मुळींच ऐकत नसे. आईनें कांहीं काम करावयास घरांत बोलाविलें कीं, तो पळून बाहेर जात असे.

एके दिवशीं मुलें अंगणांत खेळत होतीं. तेथें रामू व सदू खेळत होते. खेळ चालू असतांना आईनें रामूला व सदूला घरांत बोलाविलें. सदू चटकन् घरांत



गेला, पण रामू गेला नाहीं. रामू बोलला, " आई कांहीं तरी काम करावयास बोलावीत असेल. एवढा चांगला खेळ सोडून कोण जातो ? "

सदू घरांत गेला व आईला बोलला, " आई, काय काम आहे ? "

आई बोलली, " बाळ, काम कांहीं नाहीं. उमाकाकूनें हे आंबे आणून दिले आहेत. हे घे आणि खा; रामूला मीं बोलाविलें असून तो आला नाहीं. आतां सगळे आंबे तूंच खाऊन टाक. " सदू आंबे खात बसला.

काहीं वेळानें खेळ संपला व रामू घरांत आला. मग रामू आईला विचारूं लागला कीं, "आई, मला कशाला बोलाविलें होतेंस ?" आई बोलली, "आंबे खावयास बोलाविलें होतें. पण तूं आला नाहींस. मग मी सगळे आंबे सदूला दिले." हें ऐकून रामूला फार वाईट वाटलें. मग आईनें बोलाविलें कीं, रामू चटकन् घरांत जाऊं लागला.

म. ग्रं. सं. ठाणे, ज्ञानमालय शाखा.
बा. क्र. नों. दि.